जा.क्र - २५७६/२०१८ कार्या.सहा.पो.आ.गाडगेनगर विभाग अम. दिनांकः- ३१ / ०७/२०१८

# आदेश

## (कलम १४४ फौ.प्र.स. प्रमाणे)

ज्याअर्थी माझे असे निदर्शनास आणुन देण्यात आले आहे की, अमरावती आयुक्तालयात दिनांक ०१.०८.२०१८ रोजी पो. स्टे. गाडगेनगर, हद्यीतील गर्ल्स हायस्कुल चौक येथे अण्णाभाऊ साठे पुतळयाच्या स्थापने संबंधाने पत्रके वाटण्यात येत आहे. सदर ठिकाणी पुतळया संबंधाने मा. उच्च न्यायालयाचे Status Quo असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे दिनांक ०१.०८.२०१८ रोजी गर्ल्स हायस्कुल चौक, अमरावती येथे अण्णाभाऊ साठे जयंती निमीत्याने कोणताही अनुचित प्रकार घडु नये. तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होणार नाही.

ज्याअर्थी ०१.०८.२०१८ रोजी गर्ल्स हायस्कुल चौक, अमरावती येथे अण्णाभाऊ साठे जयंती निमीत्याने शेकडो स्त्री-पुरुष सहभागी होणार आहेत. तसेच सदर परिसरात असलेल्या शासकीय कार्यालयात कार्यालयीन कामकाजा करीता येणा-या सामान्य लोकांना गर्दीचा फायदा घेऊन गैर इराद्याने जमा होणा-या गुंड प्रवृत्तीच्या लोकांनकडुन धोका निर्माण होऊ शकतो व कायदा व सुव्यवस्थेला प्रश्न निर्माण होवु शकतो तसेच कार्यक्रम पार पाडणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी रणजित आ. देसाई, विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त गाडगेनगर विभाग अमरावती शहर मला कलम १४४(३) फौ.प्र.सं. द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा नुसार खालील प्रतिबंध घालत आहे.

१) गर्ल्स हायस्कुल चौक, अमरावती १०० मीटरचे आतिल परिसरात कोणासही प्रवेश करण्यास प्रतिबंध घालीत आहे.

मी पुढे असेही निर्देशित करतो की, सदर आदेश अमरावती शहरातील सार्वजनीक ठिकाणी दर्शनीय ठिकाणावर लावण्यात यावेत आणि मेगाफोनद्वारे याची माहिती जनसामान्यांना देण्यात यावी कलम १४४ जा.फौ. नुसार निर्गमीत करण्यात आलेले सदर आदेश दि. ०१/०८/२०१८ रोजी- ००/०१ वा. ते ००.०० वा. पर्यन्त नमुद गर्ल्स हायस्कुल चौक, अमरावती परिसरात लागु राहतील.

**या आदेशाचे उल्लंघन करणा-या विरुध्द क. १८८ भा.द.वि. नुसार कारवाई करण्यात येईल.** सदरचे प्रतिबंधात्मक आदेश आज दि. ३१.०७.२०१८ रोजी माझे सही शिक्का निशी निर्गमीत करण्यात आले आहे.

(रणजित आ. देसाई)
सहाय्यक पोलीस आयुक्त
गाडगेनगर विभाग अमरावती

पो.नि. गाडगेनगर आपले परिक्षेत्रात सदर आदेशाची जाहिरात करुन गर्ल्स हायस्कुल चौक, अमरावती या ठिकाणी बाहेर सर्वांना दिसेल अशा रितीने आदेश लावावेत

प्रत माहितीस :-

१) मा.पोलीस आयुक्त साहेब
२) मा.पो. उपायुक्त साहेब परि.१ अम.
३) मा.जिल्हाधिकारी साहेब अमरावती
४) मुख्यालय (प्रेसनोट करीता)

Scanned by CamScanner